नियमीत दिवाणी दावा क्र.६९८/२०१९

चंद्रकांत उप्परबावडे वि. शिवराज उप्परबावडे

निशाणी क्रमांक–५७

**वादीतर्फे सा.क्र.३**

**नावः** **उमाकांत वैजनाथ मल्लापूर**

**वयः** **५३ वर्षे**

**व्यवसायः** **शेती**

**पत्ताः** **मल्लापूर, ता.उदगीर.**

**वादीतर्फे सा.क्र.३ यांचा शपथेवर सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.बी.पी.आंबेकर यांच्यातर्फे सुरू:–**

समन्सप्रमाणे मी आज साक्ष देण्यास उपस्थित आहे. मी चंद्रकांत, शिवराज म्हणजेच वादी व प्रतिवादी यांना ओळखतो. आमचे पाहुणे असल्याने मी त्यांना ओळखतो. वादी व प्रतिवादी क्र.१ यांना अजुन दोन भाऊ असून ते चौघेजण आहेत. वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत जमीन उदगीर कौळखेड रस्त्यालगत आहे. त्यांच्या दरम्यान काय झाले हे मला माहिती नाही कानमंदे यांनी फक्त माझी सही एका कागदावर घेतली होती, मी जागेवर पण गेलो नाही.

**वादीतर्फे सा.क्र.३ यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.पी.एम.कोणे यांच्यामते त्यांना उलटतपास घेण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे उलटतपास नाही.**

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.29 17:21:08 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– २९/०७/२०२६**